## ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
दिांक :-२०.११.२०१४

**मा. सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**
**सभा क्रमांक २० दिनांक २०.११.२०१४**
**सभा सूचना क्रमांक ०७ दनांक ११.११.२०१४**
**सभा क्रमांक ०२ दिनांक २०.११.२०१४**

ठाणे महानगरपालिकेची मा सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २०.११.२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक ०७ दिनांक ११.११.२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती. परंतू सदरची सभा तहकूब झाल्याने पुन्हा त्याच दिवशी त्याचठिकाणी सदरची सभा दुपारी ०१.१० वाजता आयोजित करण्यांत आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. संजय भाऊराव मोरे हे उपस्थित होते.
सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे .

**१) श्री. संजय भाऊराव मोरे - महापौर**
**२) श्री. राजेंद्र रमेश साप्ते - उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | आरज प्रगती भारत | ४ | नरेश रतन मणेरा |
| ५ | मढवी बिंदू महेंद्र | ६ | डुंबरे मनोहर जयसिंग |
| ७ | मुकेश मधुकर मोकाशी | ८ | उज्वला रामचंद्र फडतरे |
| ९ | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | १० | मधुकर रामचंद्र पावशे |
| ११ | स्नेहा अंकुश पाटील | १२ | भोईर संजय देवराम |
| १३ | उषा संजय भोईर | १४ | हरिश्चंद्र श्रीपत पाटील |
| १५ | आशादेवी शेरबहादूर सिंह | १६ | चव्हाण सुधाकर वामन |
| १७ | चव्हाण तेजस्विनी किरण | १८ | इंदिसे रेखाबाई मिनानाथ |
| १९ | विलास चंदू कांबळे | २० | प्राजक्ता प्रदिप खाडे |
| २१ | राधा फत्तेबहादूर सिंह | २२ | सुशिला संकटाप्रसाद यादव |
| २३ | जाधवर राधाबाई सुभाष | २४ | राजकुमार रामनयन यादव |
| २५ | पाटील वर्षा वसंत | २६ | सरैय्या अमित जयसिंग |
| २७ | भोईर विमल अर्जून | २८ | जगदाळे हनुमंत ज्ञानु |
| २९ | पाटील कल्पना हरिश्चंद्र | ३० | चव्हाण विक्रांत भिमसेन |
| ३१ | डिसोजा लॅारेन्स साल्वाडोर | ३२ | पाटील शारदा विजय |
| ३३ | लासे विजया मनोज | ३४ | गौरी अनिता सुनील |

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | पाटील उमेश काशिनाथ | ३६ | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| ३७ | देसाई सुहास सुर्यकांत | ३८ | महेश्वरी संजय तरे |
| ३९ | मिलिंद माधव पाटणकर | ४० | एगडे रामचंद्र हरी |
| ४१ | नंदा कृष्णा पाटील | ४२ | नंदिनी राजन विचारे |
| ४३ | मंदार प्रमोद विचारे | ४४ | वडवले संतोष वसंत |
| ४५ | कणसे निर्मला शरद | ४६ | वैती अशोक बारकू |
| ४७ | बोरीटकर प्रभा अशोक | ४८ | तायडे रामभाऊ महादेव |
| ४९ | भोईर एकता एकनाथ | ५० | आशा बाबासाहेब कांबळे |
| ५१ | शिंदे मनोज तुकाराम | ५२ | शान मनप्रीत गुरमकसिंग |
| ५३ | काशिराम गोविंद राऊत | ५४ | संगिता माणिक पाटील |
| ५५ | मोरे संध्या सुनिल | ५६ | घाडीगांवकर संजय पांडुरंग |
| ५७ | जानकर योगेश तातोबा | ५८ | खताळ विशाखा मधुकर |
| ५९ | वेतकर दिपक विजय | ६० | जगताप अश्विनी अशोक |
| ६१ | भोसले नम्रता दिपक | ६२ | संखे मिनल मुकूंद |
| ६३ | हिराकांत बेंडू फर्डे | ६४ | म्हस्के नरेश गणपत |
| ६५ | मोरे रुचिता राजेश | ६६ | पाटील सुजाता भास्कर |
| ६७ | सोनार सारिका संजय | ६८ | नारायण शंकर पवार |
| ६९ | महेश सुरेश वाघ | ७० | कोकाटे सुधीर विष्णु |
| ७१ | नजीब सुलेमान मुल्ला | ७२ | वाघ पुजा गणेश |
| ७३ | साळवी अपर्णा मिलींद | ७४ | वहिदा मुस्तफा खान |
| ७५ | महेश जगन्नाथ साळवी | ७६ | साळवी मनोहर रामा |
| ७७ | पाटील मनाली मिलींद | ७८ | मनिषा महेश साळवी |
| ७९ | केणी प्रमिला मुकूंद | ८० | पाटील मिलींद भारत |
| ८१ | हंडोरे मेघना सुनिल | ८२ | केणी मुकूंद बाळू |
| ८३ | लोखंडे सुहासिनी सुनिल | ८४ | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट |
| ८५ | अनिता अरुण बिर्जे | ८६ | सामंत विलास शिवराम |
| ८७ | पाटील मालती रमाकांत | ८८ | संजय संतू वाघुले |

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| ८९ | रेखा भालचंद्र पाटील | ९० | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) |
| ९१ | नाईक राजश्री सुनिल | ९२ | राजे गिरीश अनंत |
| ९३ | राजेश भालचंद्र गवारी | ९४ | यादव रिटा राजनाथ |
| ९५ | ठाकूर अक्षय अनंत | ९६ | काकडे बालाजी दगडू |
| ९७ | कळंबे मंगल चंद्रकांत | ९८ | कुरेशी यासीन अय्युब |
| ९९ | कुरेशी साजिया आई | १०० | विश्वनाथ भगत |
| १०१ | असिया यासिन कुरेशी | १०२ | भगत सुधीर रामचंद्र |
| १०३ | गोटे सिंधू कुंदन | १०४ | पाटील रेश्मा रमेश |
| १०५ | किणे राजन नारायण | १०६ | हफिजा नसीरुद्दीन नाईक |
| **१०७** | मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग | १०८ | खान मिराज नईम |
| १०९ | आशरीन इब्राहीम राऊत | ११० | हिरा सिताराम पाटील |
| १११ | अन्सारी साजिया परवीन सरफराज | ११२ | मुंडे सुनिता गणेश |

गैरहजर सदस्य खालीलप्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पुर्णेकर जयनाथ यशवंत | २. | वाव्हळ सुभाष सिताराम |
| ३. | संभाजी धोंडिराम पंडीत | ४. | पालांडे दशरथ बाबुराव |
| ५. | सरनाईक परिषा प्रताप | ६. | सरनाईक विहंग प्रताप |
| ७. | पांडे संजय श्रीनाथ | ८. | जितेंद्र प्रभाकर वाघ |
| ९. | भरत अभिमन्यु चव्हाण | १०. | पाटील अवंतिका शशिकांत |
| ११ | पठाण अशरफ उस्तान | १२ | डोंगरे सिराज महम्मद अली |
| १३ | पाटील शैलेश मनोहर | | |

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

3/-

20139



श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय, सभागृहात प्रशासनाचे अधिकारी उपस्थित दिसत नाहीत.

श्री.संजय घाडीगांवकर :

महापौर महोदय,आयुक्त कार्यालयामध्ये अधिका-यांची बैठक चालु आहे. आज महासभा आहे हे त्यांना माहित नाही कां?

मा.महापौर :

अधिका-यांना बोलाविण्यात आले आहे.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय,आपण सभागृहात प्रशासनाची वाट बघत बसायचे कां?

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय, आज लोकशाही प्रशासनाची वाट बघत आहे हे इतिहासात पहिल्यांदा घडत आहे.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय, महापौर सभागृहामध्ये आल्यानंतर वीस मिनिटे प्रशासनाच्यावतीने कोणतेही अधिकारी उपस्थित नव्हते. व सभागृहाच्यादृष्टीकोनातून ही अत्यंत चुकीची बाब आहे आणि हे गांभिर्याने घेणे अतिशय गरजेचे आहे. तरी याबाबत प्रशासनाच्यावतीने खुलासा करावा की असे कां घडले आहे?

श्री.नारायण पवार :

महापौर महोदय, विरोधी पक्षनेते यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की जर प्रशासनप्रमुख सभागृहात हजर नसेल तर त्यांच्या खुर्चीवर कोणी बसायचे याबाबत लेखी आदेश असतो का ,याबाबत आम्हाला खुलासा करण्यात यावा. कारण मा.आयुक्तांच्या खुर्चीवर प्रशासनप्रमुख म्हणून कोणीही बसतो.

मा.महापौर :

जर सन्मा.आयुक्त कोणत्या एका कारणास्तव सभागृहात हजर राहू शकले नाही तर त्यांनी प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी त्यांच्यावतीने उपस्थित राहू शकतात.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय माझा प्रश्न संपला नाही.

महापौर
महानगरपालिका ठाणे

श्री.विलास सामंत :

महापौर महोदय विषयपत्रिकेला सुरुवात करण्यापुर्वी गेले तीन वर्ष आपल्याकडे वारकरी भवन अणि जेष्ठ नागरीकांसाठी तयार केलेली एक वास्तु ही गेले तीन वर्ष धुळ खात पडली आहे याबाबत प्रशासनाकडे अनेक लोकांची निविदा किंवा पत्र आली असतील. तरी यावर त्वरीत निर्णय घेऊन त्यांना ती वापरण्यास देण्याबाबत आपण योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे परंतू अदयाप ही कार्यवाही झालेली नाही. दरवर्षी वारकरी येतात दरवर्षी वारक-यांची दिंडी जाते परंतू त्याचा उपयोग कांही होत नाही. जेष्ठ नागरीक तळयावर फिरत असतात त्यांना ती वास्तु पाहिजे आहे. तरी याबाबत तांतडीने पावले उचलुन कार्यवाही करावी अशी मी सगळयांच्यावतीने आपणास विनंती करीत आहे.

२/-

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय आत्ता सन्मा.जेष्ठ सदस्य श्री.विलास सामंत यांनी जी सूचना मांडली आहे की वारकरी भवनाचे उद्‌घाटन झालेले आहे. तसेच जेष्ठ नागरीक भवन याचे उद्‌घाटन झालेले आहे. आज त्यांच्या प्रभागात हया वास्तु असुन त्या धुळ खात पडल्या आहेत तरी त्या वास्तु वापरण्याकरीता ज्यांनी अर्ज केले आहेत त्यांना त्या वास्तु त्यांच्या ताब्यात दयाव्यात अशाप्रकारचा ठराव मी याठिकाणी मांडत आहे तरी यास मा.विरोधी पक्षनेते यांनी अनुमोदन दयावे.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय, मी मा.सभागृह नेते यांच्या विषयाचा सन्मान करतो. या विषयाला माझा विरोध नाही. परंतू याठिकाणी सभा चालू झाली आहे कां, आणि चालु झाली असल्यास या सभेची प्रक्रिया ही कांय कांय झाली आहे हे प्रथम सभागृहास सांगण्यात यावे, आणि त्याअगोदर मी याठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला आहे की महापौरांसारखी सन्मा.व्यक्ती याठिकाणी येऊन बसलेले असताना प्रशासनाच्यावतीने याठिकाणी एकही अधिकारी जवळजवळ १० ते १५ मिनिटे हजर राहिले नाहीत याचा खुलासा प्रशासनाच्यावतीने करण्यात यावा त्याचप्रमाणे ही सभा चालु झालेली आहे का, आणि चालु झाली असेल तर त्याची प्रक्रिया कशाप्रकारे राबविली आणि ती कुठपर्यंत गेली आहे याचा प्रथम खुलासा करण्यात यावा.

मा.उपआयुक्त श्री.रणखांब :

महापौर महोदय,आज एलबीटीच्या निर्णयासंदर्भामध्ये मंत्रालयामध्ये मा.मुख्यमंत्री साहेबांची बैठक आहे व त्यासंदर्भात महापालिकेचे कोणकोणते प्रस्ताव आहेत तसेच महापालिका याबाबत काय सुचवू शकते याबाबत मा.आयुक्त साहेबांकडे डिस्कशन होते आणि या डिस्कशनमध्ये थोडासा वेळ लागला .आता मा.आयुक्त साहेब मंत्रालयामध्ये मिटींगकरीता निघाले आहेत. सगळेच अधिकारी मा.आयुक्त साहेबांच्या कार्यालयामध्ये चर्चेसाठी होते ,तरी येण्यास थोडा वेळ लागला आहे तरी याबाबत दिलगीरी आहोत.

मा.विरोधी पक्षनेते :

मा.महापौर हे या सभागृहाचे तसेच या शहराचे प्रथम नागरीक आहेत ते ज्यावेळी या सभागृहात येऊन खुर्चीवर विराजमान होत असतात त्यापुर्वी प्रशासनाचे अधिकारी सभागृहात उपस्थित असणे गरजेचे आहे. तरी मी एवढीच आपल्याकडुन अपेक्षा करतो यापुढे मा.महापौरांचा अशाप्रकारे अपमान होईल असे प्रशासनाकडुन होता कामा नये.

मा.उपआयुक्त श्री.रणखांब :

याबाबतची प्रशासन नोंद घेईल.

मा.सचिव :

मा.महापौर महोदय आजच्या सभेपुढे एकुण १२ सन्मा.सदस्यांची प्रश्नोत्तरे असुन प्रश्नोत्तराला सुरुवात करत आहे. पहिला प्रश्न सन्मा.सदस्या श्रीमती विशाखा खताळ यांचा आहे.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय, सन्मा.विरोधी पक्षनेते यांनी कांही प्रश्न विचारले आहेत त्याचे प्रथम मा.महापौरांनी उत्तर दयावे.

मा.विरोधी पक्षनेते :

मी याठिकाणी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मा.सचिव यांनी प्रथम उत्तर दयावे.

महापौर
महानगरपालिका ठाणे

मा.सचिव :

महापौर महोदय आज सभेला सुरुवात झाल्यानंतर सभा सूचना वाचण्यात आल्यानंतर प्रश्नोत्तराला सुरुवात करण्यात आली होती परंतू सन्मा.सदस्य श्री.रामभाऊ तायडे यांनी जवखेड-खालसा येथील झालेल्या घटनेची गंभीर दखल घेऊन तहकूबी मांडली व त्यास काँग्रेस पक्षाचे गटनेते श्री.विक्रांत चव्हाण यांनी अनुमोदन दिले त्यानंतर मा.महापौर महोदय यांनी निर्णय दिलेला आहे.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय सभाशास्त्र कांय म्हणते ?

मा.महापौर :

मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सभाशास्त्रानुसार प्रथम प्रश्नोत्तराचा तास असतो व त्याप्रमाणे तो सुरु केला होता, परंतू सन्मा.सदस्य श्री.रामभाऊ तायडे यांनी ज्या विषयासंदर्भात तहकूबी मांडली होती त्यावेळी त्यांना असे सांगण्यात आले होते की, आता प्रश्नोत्तराचा तास आहे परंतू त्यांनी तो विषय मांडल्यानंतर त्यास सन्मा.विक्रांत चव्हाण यांनी अनुमोदन दिले. याबाबत श्री.तायडे यांनी तहकूबी मांडली होती आणि सभाशास्त्रानुसार तहकूबी नंतर असते परंतू त्यांनी विनंती केली आणि त्या विषयाचे गांभिर्य लक्षात घेऊन मी तो निर्णय दिला की त्यांच्या म्हणण्यानुसार सभा एक तास तहकूब करावी.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय, आता सचिवांनी स्पष्टीकरण करावे की, या सभागृहात मा.महापौर महोदयंनी प्रश्नोत्तरे संपल्यानंतर आपण तहकूबीवर चर्चा करु असे रुलिंग दिले होते कां?

श्री.विक्रांत चव्हाण :

महापौर महोदय, याठिकाणी सचिव हजर आहेत. महापौर महोदय, सन्मा.तायडे यांच्या विनंतीला मान देऊन मी अनुमोदन दिले, सभाशास्त्राप्रमाणे आपण रुलिंग दिले की ही सभा तहकूब करता येणार नाही, प्रश्नोत्तरे होतील. तरी एकदा रुलिंग दिल्यानंतर आपण पुन्हा सभा तहकूब कशी केली? याचे उत्तर मा.महापौर तसेच मा.सचिव यांनी दयावे.

श्री.विलास सामंत :

महापौर महोदय, सन्म.सदस्य श्री.रामभाऊ तायडे यांनी सभागृहात तहकूबी मांडण्यापुर्वी आपल्याला सांगितले होते की, ही गांभिर्याची बाब आहे मी तहकूबी मांडतो व त्यावर आपण सांगितले की प्रश्नोत्तरे झाल्यानंतर तहकूबी घेऊ, ठिक आहे तुम्ही मांडु शकता. व त्यास सन्मा.सदस्य श्री.विक्रांत चव्हाण यांनी त्यास अनुमोदनसुध्दा दिले त्यावेळी सभागृहामध्ये हे सगळे उपस्थित नव्हते. आणि आपण दिलेले जे रुलिंग आहे ते यांच्या कानावर गेलेले नाही, परंतू तरीसुध्दा याठिकाणी जे कांही मिनिटस झाले असेल ते वाचुन दाखवा त्यामुळे हा तांत्रिक मुद्दा होत नाही व कोणत्याही प्रकारे नियमाचे उल्लंघन झालेले नाही.

श्री.विक्रांत चव्हाण :

महापौर महोदय, सन्मा.सदस्य सिनियर आहेत, परंतू सभाशास्त्राप्रमाणे एकदा रुलिंग दिल्यानंतर तुम्ही रुलिंग बदलता. हे कायदयाप्रमाणे योग्य आहे की अयोग्य आहे याबाबत प्रशासनाने उत्तर दयावे.

सही/-
महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

श्री.विलास सामंत :

सभागृहात उपस्थित राहणे आणि सभागृहाच्या पटलावर हजेरी लावणे महत्वाचे आहे व यांनी हजेरी लावली नव्हती.

श्री.रामभाऊ तायडे :

महापौर महोदय, मी जेव्हा हा विषय घेतला त्यावेळी तहकूबीचा विषय घेतला व एक ते दिड तासासाठी हा विषय तहकूब ठेवा व त्यास सन्मा.सदस्य श्री.विक्रांत चव्हाण यांनी लगेच उठुन यास अनुमोदन दिले आहे. तसेच माझे असे म्हणणे आहे की या विषयाचे आपण गांभिर्य लक्षांत ठेवले पाहिजे. तरी याचे भांडवल करु नका असे मला वाटते.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की नियमामध्ये प्रश्नोत्तरानंतर तहकूबी घेतली पाहिजे परंतू तसे न करता आपण सर्वप्रथम तहकूबी घेतली आणि नंतर प्रश्नोत्तराकरीता वाच्यता केली हे योग्य आणि कायदेशीर आहे कां?

मा.महापौर :

सभाशास्त्राबाबत आपण बोलत आहात, बरोबर आहे व ते मला मान्य आहे व त्याप्रमाणे मी सगळया गोष्टी केल्या होत्या परंतू त्यांनी पुन्हा विनंती केली..,

श्री.मनोज शिंदे :

हे कायदेशीर योग्य आहे का याचे मला उत्तर पाहिजे.

मा.महापौर :

सन्मा.सदस्य श्री.मनोज शिंदे यांनी मांडलेला हरकतीचा मुद्दा फेटाळण्यात येत आहे.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय माझा हरकतीचा मुद्दा कां फेटाळण्यात आला आहे याबाबतचे मला कारण सांगण्यात यावे.

मा.महापौर :

सन्मा.सदस्य श्री.मनोज शिंदे आपण खाली बसावे.

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)**

श्रीमती विमल भोईर :

महापौर महोदय, विषयाला सचिवांनी सुरुवात केली परंतू त्याचवेळी सन्मा.रामभाऊ तायडे यांनी दलितांवर जे हत्याकांड झाले आहे त्याबाबत त्यांनी तुम्हाला विनंती केली ,सचिवांनी प्रश्नोत्तराला सुरुवात केली तेव्हा त्यांनी पुन्हा विनंती केल्यानंतर आपण सभा तहकूब केली आहे, तरी याकरीता एवढा हल्लाबोल करण्याची कांहीच गरज नाही. दलितांवर हत्याकांड झाले आहे व मी सुध्दा एक दलित आहे. तरी हा विषय गांभिर्याने घ्यावा.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय, याठिकाणी प्रथमदर्शनी सर्व सभागृहाच्या निदर्शनास आम्ही आणु इच्छितो की, दलितांचे हत्याकांड झालेले आहे व त्याचे राजकारण आम्ही करत नाही. तसेच

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

श्री.रामभाऊ तायडे :

आपण जो दलित विषयावर बोलत आहात तर बौध्द कुटुंबांची हत्या झालेली आहे.

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)**

श्री.विक्रांत चव्हाण :

महापौर महोदय, मी सन्मा.तायडे यांना सांगू इच्छितो की ,विषयाचे गांभिर्य लक्षांत घेऊन मी त्यास अनुमोदन दिले होते. तुम्ही विषयाचे गांभिर्य लक्षांत न घेता प्रश्नोत्तरे चालु ठेवण्याचे काम तुम्ही केले, तरी याबाबतचे गांभिर्य तुम्ही पाळले नाही असा आमचा तुमच्यावर आरोप आहे. वास्तविक एका दलित हत्याकांडावर एका सन्मा.सदस्याने हा विषय घेतल्यानंतर आमच्यासारख्या विरोधी पक्षातील सदस्याने त्याला पाठींबा दिल्यानंतर तुमचे कर्तव्य होते की सत्ताधा-यांचे महापौर म्हणून ही सभा तहकूब करावी ती तुम्ही केली नाही. सभाशास्त्राप्रमाणे तुम्ही चालु ठेवली व त्यानंतर तुम्ही तुमचा निर्णय पुन्हा बदलला ,तरी हे कायदयाला धरुन होते का,याचे स्पष्टीकरण कृपया दयावे, आणि पुन्हा पुन्हा याचे भांडवल करु नये,अशाप्रकारचे चुकीचे आरोप होता कामा नये, कारण त्याला पाठींबा आम्ही दिला होता, तरी ही तहकूबी योग्य होती की अयोग्य होती याचे उत्तर दयावे. तरी पहिला निर्णय योग्य होता की दुसरा निर्णय योग्य होता याचे स्पष्टीकरण सचिवांनी दयावे.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय, दलित हत्याकांडावर चर्चा करुन ही सभा संपूर्ण दिवसासाठी तहकूब करावी अशी आमची मागणी आहे.

श्री.सुहास देसाई :

सन्मा.जेष्ठ सदस्य श्री.मनोज शिंदे यांनी मांडलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे. व हिच खरी श्रध्दांजली असेल असे माझे मत आहे.

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)**

श्री.रामभाऊ तायडे :

महापौर महोदय, अहमदनगरमधील पाथार्डी तालुक्यातील जवखेड-खालसा येथे तीन बौध्द कुटुंबांची हत्या झालेली आहे. दलित नव्हे व दलित दलित बोलुन तुम्ही आम्हाला हिणवू नका. आम्ही बौध्द आहोत हे लक्षांत ठेवा. सन १९५६ साली परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी आम्हाला दिक्षा दिली आहे. दलित असे बोलुन तुम्ही आम्हाला हिणवु नका. बौध्द कुटुंब म्हणा. मी याठिकाणी राजकारण करीत नाही. तुम्ही राजकारण करत आहात. आपण विषयाचे गांभिर्य लक्षात घ्या.

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)**

मा.सभागृह नेते :

माझी सभागृहाला विनंती आहे की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन कोठेही राजकारण करण्याचा प्रयत्न करु नका.

श्रीमती रेखा इंदिसे :

महापौर महोदय हा दलितांचा प्रश्न आहे व मी सुध्दा एक दलित आहे. दलितांना जर खरी श्रध्दांजली दयायची असेल तर आजची सभा ही पुर्ण दिवसाकरीता तहकूब करण्यात यावी.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

e

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय, दिवसभर चर्चा करुन सभा तहकूब करण्यात यावी.

मा.विरोधी पक्षनेते :

तहकूबीची जी प्रक्रिया असते ती कोठेही राबविली गेली नाही.किंवा वाचून दाखविण्यात आली नाही.

श्री.विक्रांत चव्हाण :

याठिकाणी मा.सचिवांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दयावे की,प्रश्नोत्तरापुर्वी घेतलेली सभा तहकूबी ही योग्य होती की अयोग्य होती?

मा.सचिव :

मा.महापौर,याबाबत नियम असा आहे की, पिठासिन प्राधिका-यांनी सभेच्या कार्यसुचीवरील कामकाज चालविण्यासाठी म्हणून आसन ग्रहण केल्यानंतर कोणत्याहीवेळी पालिका सदस्यास ..,

मा.विरोधी पक्षनेते :

आम्ही तुमच्याकडे उत्तर मागितलेले नाही.

मा.सचिव :

मी नियम वाचून दाखवित आहे.

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)**

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय याठिकाणी सन्मा.तायडे यांनी एक तासाची तहकूबी मांडली होती व त्यास विक्रांत चव्हाण यांनी अनुमोदन दिले आहे.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय, प्रश्न हा नाही. प्रश्न हा आहे की जर तुमच्या सदस्याकडून राजकरण करत आहात अशाप्रकारचे वक्तव्य या सभागृहामध्ये होत असेल ..,

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय आम्ही दलित हत्याकांडच्या निषेध करीत असुन हे आरोपी अजूनही मोकाट आहेत . तरी आजची सभा ही संपूर्ण दिवसाकरीता तहकूब करावी.

श्री.रामभाऊ तायडे:

तुम्हाला जर ही सभा पूर्ण दिवसाकरीता तहकूब करायची होती तर तुम्ही सभागृहामध्ये कां आला नाहीत? एवढी कळकळ होती तर सभागृहामध्ये लवकर कां आला नाहीत?

मा.महापौर :

एक तास जेवणाकरीता सुट्टी करण्यात येत आहे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

e/-

**जेवणाच्या सुट्टीनंतर दुपारी ३.०५ वाजता सभा पुन्हा सुरु झाली.**

**श्री. बालाजी काकडे :-**

मा.महापौर महोदय, मगाशी विरोधी पक्षनेत्यांनी सुचना केली होती महापौर येण्याच्या आगोदर सगळे अधिकारी असले पाहिजेत. परंतू तुम्ही येऊन पाच मिनिटं झाली पण अधिकारी आले नाहीत.

**मा.महापालिका सचिव :-**

मा. महापौर महोदय, आपण प्रश्नोत्तरांना सुरुवात करतोय.

**श्रीम. रेखाबाई इंदिसे :-**

मा.महापौर महोदय, जवखेड-खालसा येथे जे हत्याकांड झाले आहे त्याच्या निषेधार्त सभा तहकूबी मांडली आहे. एक तास नाही पूर्ण दिवस सभा तहकूब करावी अशी मी विनंती करते. दलितांना न्याय दयायचा तर.

**श्रीम. मिनाक्षी शिंदे :-**

मा. महापौर महोदय, तहकूबी मांडली मगाशी आपण एक तासाची तहकूबी दिली. पण पूर्ण वेळ जर तहकूब केली तर त्याच्याने न्याय काय भेटणार आहे ते मला आतापर्यंत कळले नाही.

**श्री. मनोज शिंदे :-**

दलितांवर अन्याय झाल्यावर या ठिकाणी संपूर्ण वेळ तहकूब झाल्यावर काय न्याय मिळणार या संदर्भामध्ये .. .. ..

**श्री. संतोष वडवले :-**

मा.महापौर रुलिंग देतात ऐकून घ्या ना.

**श्रीम. रेखाबाई इंदिसे :-**

मा.महापौर महोदय, एवढे मोठे ते हत्याकांड आहे एका तासात न्याय मिळतो का? तिथे एका व्यक्तीची हत्या झालेली नाही.

**मा.महापौर सो. :-**

ज्या सदस्यांनी या संदर्भात सभा तहकूबी मांडली होती त्यांनी जी विनंती केली त्याप्रमाणे विनंतीनुसार एक तास तहकूब केलेले आहे आणि त्याच विषयावर परत तहकूबी देता येत नाही. त्यामुळे सभागृहाला विनंती आहे आपण कामकाज सुरु करावे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, त्यावेळेला तहकूबी वाचून दाखवली होती का सचिवांनी याचे उत्तर दयावे.

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, हयांनी तहकूबी बोलले त्यानंतर कॉंग्रेसच्या गटनेत्यानी अनुमोदन दिलेलं आहे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, हया विषयाचे राजकारण आम्ही केलेले नाही राजकारण हे आपल्याकडून सुरु झालेले आहे त्यामुळे संपूर्ण दिवस तहकूब करावी.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

**मा.सभागृह नेते :-**

विरोधी पक्षाने त्या तहकूबीला अनुमोदन कसे दिले? त्या सदस्याने तहकूबी मांडली होती त्या सदस्याने इथे त्याचे वाचन केले.

**मा. विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, अनुमोदन देताना . रुलिंगच्या संदर्भात या ठिकाणी सभागृहात वक्तव्य झालेले आहे. म्हणून त्याचा पुनरुच्चार या ठिकाणी सभागृहात करु नका. आम्हाला खरोखरच त्या घटनेचा निषेध करायचा आहे. आणि ती झालेली घटना वास्तविक पाहता चुकीची घटना आहे. त्याच्यामध्ये आम्हाला कुठल्याही प्रकारचे राजकारण आणायचे नाही.

**मा. सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी विरोधी पक्षानी पुढे चर्चेचे वाट न पाहता, ताबडतोब अनुमोदन दिलेलं आहे.

**मा. विरोधी पक्षनेते :-**

काय अनुमोदन दिलेलं आहे?

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)**
**(मा.महापौर महोदय, उभे राहून हस्तक्षेप करतात.)**
**(सभागृहात घोषणा देण्यात येतात.)**

**मा.महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदयांनी विषयपत्रिका वाचण्याचे आदेश दिलेले आहेत.

**( महापालिका सचिव प्रकरण क्रमांक ७४ वाचण्यास सुरुवात करतात.)**

विषय :- ठाणे महानगरपालिकेच्या दि. १०/०९/२०१४ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)**
**(सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्षातील सन्मा.सदस्य डायसवर जातात.)**
**(सभागृहात घोषणा देण्यात येतात.)**

**मा.महापौर सो. :-**

मनोज शिंदेचं निलंबन करायचे मी सांगातो. रुलिंग .. .. ..

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)**

**मा.महापौर सो. :-**

हया सगळयांना खाली घ्या.

**(सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्षातील सन्मा.सदस्य डायसवर जातात.)**
**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती चालूच रहाते.)**

**श्रीम. मिनाक्षी शिंदे :-**

करु दे, करु दे, करा करा.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

**श्रीम. नम्रता भोसले :-**

लोकांना कळायला पाहिजे कशाप्रकारची हयांची वागणूक आहे. पुढच्या वेळी हयांना लोक इलेक्शनला उभे करणार नाही.

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती चालूच रहाते.)**

**श्रीम. मिनाक्षी शिंदे :-**

मा.महापौर महोदय, .. .. .. मा.महापौर महोदय, कुणाला बाहेर काढू नका . जरा आपले प्रताप कळू दया सगळयांना सभागृहात काय करतात ते. ज्या लोकांनी निवडून दिले आहे त्यांना कळू दया सभागृहात काय चालते ते. आज ३२ वर्षाच्या कारकिंदीत पहिल्यांदाच ही लाजीरवाणी घटना हया महापालिकेमध्ये घडली आहे.

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती चालूच रहाते.)**

**श्रीम. मिनाक्षी शिंदे :-**

मा. महापौर साहेब .. .. ..

**श्री. सुधीर भगत :-**

मा. महापौर महोदय, जागेवर बसून काय घ्यायचा तो निर्णय आपण घेऊ.

**श्री. मिनाक्षी शिंदे :-**

मा.महापौर साहेब, आता सगळयांना जागेवर बसवा. आता खुप झाले. महापौर साहेब, सगळयांना जागेवर पाठवा. आता बोलणार मी. मघापासून गप्प होते आता बोलणार. चला आता आर या पार. मा.महापौर साहेब, मी बोलणार नंतर तुम्हाला काय करायचे ते करा.

मा.महापौर साहेब, दोन मिनिटं मला बोलू दया मघाचपासून सगळे बोललेत मी बोलले नाही. मला बोलू दया जरा.

मा.महापौर महोदय, मला बोलू दया. मी बोलल्याशिवाय खाली बसणार नाही. आता तुम्ही तापवलय आहे तर एकदाच सगळं तापू दे. मी काही वेगळं बोलणार नाही. पण मला बोलू दे. सभागृहामध्ये झालेल्या प्रकाराबाबत बोलायचय. महापौर साहेब, एवढा वेळ झालेला गोंधळ आहे.

**मा.महापौर सो. :-**

मिनाक्षी मॅडम विनंती आहे.

**श्रीम. मिनाक्षी शिंदे :-**

मा.महापौर साहेब, विनंती करताय मी बसते. पण परत मला उठायचा चान्स दया. साहेब, मी दुसरं काही बोलणार नाही. मघाचपासून झालेला जो प्रकार आहे ना? आज गेली ३२ वर्ष महापालिकेचा जो काही कारभार चाललेला आहे. हयाप्रकाराबाबत हयांनी निषेध व्यक्त केला जे हत्याकांड झालं, त्याच्याबद्दल मघाचपासनू जो वाद झाला .. .. ..

**मा.महापौर सो. :-**

एक मिनिटं इकडे या.

**श्रीम. मिनाक्षी शिंदे :-**

मा.महापौर साहेब, मी वेगळं काही बोलत नाही. प्लिज, मला बोलू दया.

**मा.महापौर सो. :-**

एक मिनिटं इकडे या.

महापौर
... महानगरपालिका ठाणे

**श्रीम. मिनाक्षी शिंदे :-**

मा.महापौर महोदय, नाही, नाही. त्यांच राजकारण वेगळं आहे. माझे वेगळं आहे. मी वेगळया विषयावर बोलतयं. दुस-या हयाच्यावर बोलत नाही.

मा.महापौर महोदय, आज सकाळपासून आम्ही सभागृहात बसलोय की, सभा चालू होईल. दोन महिन्यानंतर लागलेली सभा आहे. प्रभागातील बरीचशी कामे राहिलेली आहेत. आणि त्या संदर्भात आम्ही महिला म्हणून आर्वजून प्रत्येक वेळी वेळेवर येऊन उपस्थित राहतो. पण दर वेळेला असा काहीतरी प्रकार होतो सभा तहकूब करायला लागते आणि सगळे निघून जातात. पण आमच्या प्रभागातील कामे तशीच राहतात. आज सकाळपासून जो प्रकार बधितला मही जो दलित हत्याकांडाबद्दल, सॉरी, म्हणजे बौध्द. आता दलित-बौध्द त्याच्यातील फरक मला काही कळत नाही.

**श्रीम. मिनाबाई इंदिसे :-**

फरक कळत नाही तर बोलता कशाला?

**श्री. मिनाक्षी शिंदे :-**

मी तुमच्याबद्दलच बोलते. मला कळत नाही बोलले मी तुम्हाला कळतं ना? मधाचपासून दलित-दलित तुम्हीच ओरडत होते. पण हे सारखे सांगत होते दलित नाही बौध्द म्हणा. ठिक आहे. बौध्द हत्याकांड झालं. ज्या प्रकाराबाबत सकाळपासून सभागृहामध्ये वादंग सुरु आहे. प्रत्येक जण सांगताहेत की, सभा पूर्ण वेळ तहकूब केली पाहिजे. पण गेल्या ३२ वर्षात ज्या सभागृहात बसलोय ज्यांचे अनुयायी म्हणून तुम्ही इथे भांडताय बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये. आणि त्यांच्याच नावाला काळीमा फासण्याचे काम आज तुम्ही सभागृहात केले आहे. कारण तुम्ही .. .. ..

**(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)**

**श्रीम. मिनाक्षी शिंदे :-**

आज सकाळपासून सभागृहात ज्या गोष्टीवरुन वाद चालला आहे. पण पंडीत साहेबांना आई-बहिणीवरुन शिव्या देऊन सत्कार इथे केला. सभागृहातील सगळयांनी डोळयानी पाहिला आहे. जर त्यांच्याबद्दल खरच तुमच्या मनात भावनिक बाब होती तर तुम्ही त्याच समाजातील लोकांना तुम्ही आई-बहिणीवरुन का शिव्या घातल्या? आणि सभा तहकूब करायची असेल तर झालेल्या प्रकाराबाबत आज सभागृहात ज्या आई-बहिणीवरुन शिव्या घातल्या त्या संदर्भात जर सभा तहकूब करत असाल तर आम्ही सभा तहकूब करायला तयार आहे. पण हया वायफळ गोंधळासाठी आम्ही सभा तहकूब करणार नाही.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, हे संपूर्ण वक्तव्य तुम्ही कामकाजातून काढून टाका. सचिव हे वक्तव्य कामकाजातून काढून टाका.

**श्रीम. आशा कांबळे :-**

मा.महापौर महोदय, काळीमा फासणे, वायफळ गोंधळ वगैरे जरा समज दया.

**श्री. रामभाऊ तायडे :-**

कांबळेताइ जरा थांबा. मा.महापौर महोदय, .. ..

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, हे मिनिटस्मधून काढावे अशी विनंती आहे.

महापौर
पुणे महानगरपालिका पुणे

**श्री. रामभाऊ तायडे :-**

मा.महापौर महोदय, आज इथे मी जो तहकूबीचा विषय घेतलेला आहे. मी सांगू इच्छितो की, आपल्या सभागृहामध्ये जेवढे सन्मा. सदस्य आहेत. ज्या बौध्द कुटूंबाची हत्या झालेली आहे. त्याच्या संदर्भात सभागृहात खरोखर निषेध करण्यासाठी आलेले आहेत. आणि त्यांनी निषेध या ठिकाणी मांडलेला आहे. मी सभागृहाचे आभार व्यक्त करतो. कारण हया ठिकाणी कोणीही राजकारण केलेले नाही किंवा करणार नाही. पण मधल्या काळात जे काही झाले त्याला गोंधळ म्हणता येणार नाही. कारण त्यांची भुमिका ऐकून घेतली आहे आमची पण भूमिका ऐकून घेतलेली आहे. मी सन्मा.महापौरांना विनंती केली होती की, एक-दिड तासासाठी ही सभा तहकूब करावी आणि त्यांनी माझ्या विनंतीला मान देऊन एक तासासाठी सभा तहकूब केली. परंतू विरोधी पक्षामधील आमचे जे सन्मा. सदस्य आहेत त्यांनी तो विषय लावून धरला आणि सांगितले की सभा दिवसभरासाठी तहकूब करावी. पण जे हत्याकांड झाले आहे त्याबाबत दिवसभर नाही तर आठ दिवस जरी हे सभागृह तहकूब ठेवले असते तरीही कमी पडले असते अशा पध्दतीने हे हत्याकांड घडलेले आहे. अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी तालुक्यामध्ये जवखेड-खालसा हया ठिकाणी जाधव कुटूंबातील आई-वडिल आणि त्यांचा तरुण १९ वर्षाचा मुलगा सुनिल हयांचे तुकडे-तुकडे करुन त्यांना मारण्यांत आलेले आहे. सुनिलचे जवळ जवळ नऊ तुकडे केले आणि बोरवेलमध्ये टाकले तर काही विहिरीमध्ये टाकले, आमच्या भगिनीचे तुकडे करुन शेतामध्ये आणि गावामध्ये टाकले. वडिलांचे तुकडे करुन ते अस्ताव्यस्त टाकले. अशापध्दतीने त्या ठिकाणी हत्या झालेली आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रात, जगात नाहीतर संपूर्ण भारतात त्याचे पडसाद उमटत आहेत. आणि संपूर्ण देश हादरलेला आहे. आणि अशा हया परिस्थितीमध्ये आपल्य सभागृहामध्ये जो तहकूबीचा विषय मांडलेला आहे. त्या तहकूबीचा विषयावर थोडंफार झालेले आहे. त्याला गोंधळ म्हणता येणार नाही पण थोडं फार मतभेद झालेले आहेत ते विसरुन मा.महापौर साहेब, हया ठिकाणी सर्वांची इच्छा आहे की, महासभा दिवसभरासाठी तहकूब करावी. जर आपली इच्छा असेल तर कारण तो आपला निर्णय आहे. तुम्ही एकदा एका तासासाठी सभा तहकूब केलेली आहे. परंतू परत मी सुचना करतो, विनंती करतो जर आपण महासभा दिवसभरासाठी तहकूब केली तर बरे होईल असे मला वाटते. जय भिम. जय भारत.

**श्रीम. मिनाबाई इंदिसे :-**

मा. महापौर महोदय, सन्मा. रामभाऊ तायडे साहेबांच्या तहकूबीला अनुमोदन देत आहे असे मी जाहिर करते.

**मा.महापौर सो. :-**

सन्मा. नगरसेविका मिनाक्षी शिंदे, सन्मा. सदस्य रामभाऊ तायडे, सन्मा. इंदिसे मॅडम हयांनी जी काही तहकूबी मांडलेली आहे. परंतू आताच आपण सर्वांनी सभाशास्त्रा संदर्भातील विषय काढला तर सभाशास्त्राप्रमाणे आपण एकाच विषयावर दोन वेळा तहकूब करु शकत नाही. परंतू सभागृहाचा सेन्स लक्षात घेता, मी आजची सभा खंडीत करतो.

**(मा.महापौर महोदय, दुपारी ०३.५० ला सभा खंडीत करतात.)**

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

# दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक १२४-१ दिनांक : २०.११.२०१४

ठराव :

जवखेड-खालसा येथे एका बौध्द कुटुंबातील आई-वडील व त्यांचा एकुलचा एक मुलगा अशा तिघांची अत्यंत निर्घुणपणे तुकडे-तुकडे करुन हत्या करण्यात आली. मानवता कलंकित होईल अशारितीने मानवी देहाची विटंबना करुन त्यांचा वंशच नष्ट करण्यात आला. तसेच अजुनही त्यांचे खुनी पकडले नाहीत.

तरी मृत जाधव कुटुंबियांना ही सर्वसाधारण सभा श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.नरेश म्हस्के. अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे.

सही/-संजय भाऊराव मोरे.
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

(अशोक बुरपल्ले)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा खंडीत झाल्याची वेळ:- दुपारी ०३.५० वाजता
सचिव कार्यालय
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक :- २०/११/२०१४

सही/-
श्री.संजय भाऊराव मोरे
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

दि०१३-४-१५ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे